महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणासाठी मंत्रालयीन स्तरावर कक्ष निर्माण करणे.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक-मप्रन्या-१०८९/सीआर-४०/[illegible]-३,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:- ३१ जुलै, १९८९.

शासन निर्णय-

शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांच्या सेवाविषयक तक्रारींचा विचार करुन त्यावर निर्णय घेण्यासाठी प्रशासकीय न्यायाधिकरण स्थापन करण्याबाबतच्या शासनाच्या निर्णयानुसार नवी मुंबई येथे लवकरच न्यायाधिकरणाची स्थापना करण्यात येणार आहे. न्यायाधिकरणाचे मंत्रालयीन स्तरावरील कामकाज पहाण्यासाठी मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागामध्ये एक कक्ष निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्या कक्षासाठी पुढील चार पदे दिनांक १ ऑगस्ट १९८९ पासून २९.२.९० पर्यंतच्या कालावधीकरिता निर्माण करण्यास शासन मंजुरी देत आहे.

क्रमांक	पद	वेतनश्रेणी [सुधारित]	संख्या
१.	अवर सचिव	[रुपये ३०००-१००-३५००-१२५-४५००]	१
२.	सहायक	[रुपये १४००-४०-१६००-५०-२३०० द. रो. ६०-२६००]	१
३.	लिपिक	[रुपये ९५०-२०-११५०-द. रो.-२५-१५००]	१
४.	लघुटंकलेखक	[रुपये १२००-३०-१५६०-द. रो.-४०-२०४०]	१

२. ह्या पदावर नेमणुका करताना अतिरिक्त संवर्गात असलेल्या कर्मचा-यांचा प्रथम विचार करण्यात येईल असे कर्मचारी उपलब्ध न झाल्यास तात्पुरत्या प्रतिनियुक्तीवर अथवा अन्य विहित मार्गाने नेमणुका करण्याबाबत विचार करण्यात येईल.

३. ह्या पदांवर होणारा खर्च शासन ज्ञापन, वित्त विभाग क्रमांक-आकनि-११८९/५०/अर्थसंकल्प-१३, दिनांक १५.७.८९ नुसार मंजूर करण्यात आलेल्या आकस्मिकता निधीतील रुपये ६२,०००/- [रुपये बासष्ट हजार फक्त] च्या अग्रिमातून भागविण्यात यावा आणि तो अर्थसंकल्पीय शीर्ष "९-७-२०५२-सचिवालय-सर्वसाधारण सेवा [०९०] सचिवालय [१] सामान्य प्रशासन विभाग" ह्या खाती खर्ची टाकावा. सदर आकस्मिकता निधीतून घेतलेल्या अग्रिमाच्या प्रतिपूर्तीसाठी आगामी विधान मंडळाच्या अधिवेशनात पूरक मागणी सादर करण्यात येईल.

४. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या [illegible] त्याच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक [illegible]-४४४/[illegible]-१, दिनांक [illegible] अन्वये काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[illegible]
[illegible]

प्रति,
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य-१, मुंबई,
महालेखापाल [लेखा परीक्षा] महाराष्ट्र राज्य-१, मुंबई,
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य-२, नागपूर,
महालेखापाल [लेखापरीक्षा] महाराष्ट्र राज्य-२, नागपूर,
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
मंत्रालयीन प्रशासकीय विभागांतील १४, १४[ज], १६, २५ व ३६,
वित्त विभाग [illegible],
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
निवड नस्ती.